# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.07.2024** **वार – मंगळवार**

---

**पेरण्या**

पुणे विभागातल्या तीन जिल्ह्यांमधल्या नऊ लाख 21 हजार हेक्टर क्षेत्रातल्या सरासरी 83 टक्के पेरण्या पूर्ण झाल्याची माहिती पुणे विभागीय कृषी सहसंचालक रफिक नाईकवाडी यांनी दिली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाऊस झाल्यानं पुणे जिल्हयात 50 टक्के, अहमदनगर जिल्ह्यात 86 तर सोलापूर जिल्ह्यात 99 टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत असेही नाईकवाडी यांनी सांगितलं.

**पीएमपीएमल**

पुणे महानगर परिवहन महामंडळ म्हणजेच पीएमपीएमल सार्वजनिक बससेवेच्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकपदी दीपा मुधोळ मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापुर्वी आशिष येरलेकर यांची नियुक्ती केल्याचा आदेश राज्य सरकारकडून देण्यात आला होता मात्र त्यांनी पदभार स्विकारला नव्हता. आता मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**महावितरण**

पुणे परिमंडळात पावसामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास ग्राहकांनी सहकार्य करण्याचं आवाहन महावितरण ने केले आहे. पावसाळी नियोजनाविषयी मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी नुकताच आढावा घेऊन, सुरळीत वीजपुरवठ्यासाठी सर्व विभागातील अभियंता, कर्मचाऱ्यांनी सतर्क आणि तत्पर राहावे तसंच पावसामुळे वीज यंत्रणेतील संभाव्य बिघाड टाळण्यासाठी तत्परतेने उपाययोजना कराव्यात असे निर्देश पवार यांनी संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना दिले.

**वीज थकबाकी**

पुणे विभागात विविध जिल्ह्यातल्या 20 लाख 35 हजार 944 ग्राहकांकडे एकंदर चारशे चौऱ्याऐंशी कोटी रुपयांची थकबाकी असून, महावितरणकडून थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडीत करण्याची मोहीम महावितरणकडून हाती घेण्यात आली आहे. या सर्वांवर वस्तू आणि सेवा करही लागू होतो, त्यामुळे वीजपुरवठा खंडित केल्यानंतर थकबाकी तसंच जीएसटीसह पुनर्जोडणी शुल्क भरल्याशिवाय वीजपुरवठा पुन्हा सुरु करणार नसल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

**मालमत्ता ड्रोन**

पिंपरी चिंचवड महापालिकेत अत्याधुनिक ड्रोन द्वारे मालमत्ता सर्वेक्षणाला आजपासून आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीत सुरूवात झाली. या सर्वेक्षणात वाढीव मालमत्ता, वापरात बदल केलेल्या मालमत्तांसह दोन लाख नव्या मिळकती सापडतील असा पालिकेचा अंदाज आहे. शहरातल्या प्रत्येक मिळकतीची नोंद या सर्वेक्षणात होणार आहे. त्यामुळे दीड हजार कोटींपर्यंत महसूल गोळा होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

**कर आकारणी**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत नव्यानं समाविष्ट गावांमध्ये पुरेशा नागरी सुविधा न देता पालिकेकडून करआकारणी सुरू झाल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. निवडणुकीपुर्वी करात

सवलत देण्यासंबंधी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या घोषणेची अंमलबजावणी व्हावी अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**प्रमाणपत्रे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कागदविरहीत प्रक्रियेमध्ये आणखी एक पाऊल पुढे टाकत विद्यार्थ्यांना घरबसल्या ऑनलाईन स्वरुपात शैक्षणिक प्रमाणपत्रं देणाऱ्या पोर्टलची सुरूवात केली आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल. यापुर्वी सुविधा केंद्रांकडे अर्ज सादरीकरण करून प्रमाणपत्रं मिळवावी लागत होती

**एमआयटी गोलमेज**

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या वतीनं, पुण्यात येत्या 19 ते 21 जुलैदरम्यान विज्ञान -तंत्रज्ञानावर आधारित पहिली राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषद विकसित भारत 2047 आयोजित करण्यात येणार आहे. अशी माहिती युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल कराड आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांनी वार्ताहर परिषदेत दिली. भौतिक विज्ञान, जैवविज्ञान, अभियांत्रिकी तसंच तंत्रज्ञानाच्या सर्व पैलूंवरील अनुभव आणि संशोधनाच्या परिणामांची देवाण घेवाण आणि आदान प्रदान करण्यासाठी अग्रगण्य शैक्षणिक शास्त्रज्ञ, संशोधक आणि संशोधन विद्वानांना एकत्र आणणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश्य असल्याचही कराड यांनी सांगितलं

**लाडकी बहीण**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीसाठी पिंपरी चिंचवड शहरातल्या आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी 123 केंद्रांची उभारणी करण्यात येत आहे. महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, करसंकलन विभागीय कार्यालयं आदी ठिकाणी अर्ज स्विकृती केंद्र चालू करण्यासाठी पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याच्या सूचना पालिका प्रशासनाने दिल्या आहेत.

**स्नूकर**

पुण्यात सुरू असलेल्या क्यू कल्चर अजिंक्यपद सिक्स रेड राज्यस्तरीय स्नूकर स्पर्धेत फैजल खान, तहा खान, पिनाक अनाप आणि शिवम अरोरा या खेळाडूंनी प्रतिस्पध्यांचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

**हॉकी**

पुण्यातल्या मेजर ध्यानचंद मैदानावर सुरू असलेल्या हॉकी पुणे लीग स्पर्धेत क्रीडा प्रबोधिनी संघ अपराजित राहिला. तर इतर सामन्यात पुण्याच्या फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या मनप्रीत सिंग तर फ्रेंड्स युनियन क्लबने ओंकार मुसळेच्या हॅटट्रीकच्या जोरावर बाजी मारली. तर हॉकी लव्हर्स अकॅडमीने 7-5 असा विजय मिळवला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज पावसाने विश्रांती घेतली मात्र दुपारनंतर आकाश ढगाळ असले तरीही पावसाने हजेरी लावली नाही. आज कमाल तापमान 29 अंश तर किमान 21 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

## हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.